# वैध मापन शास्त्र विभाग

## यवतमाळ जिल्हा

**ग्राहक मार्गदर्शिका**

जन्मापासून मरेपर्यंत माणूस हा ग्राहक आहे. त्याच्या दैनंदिन व्यवहारात मापन हा अविभाज्य भाग आहे. व्यापा-याकडून होणारी ग्राहकाची फसवणूक रोखण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे कायदे व नियम तयार केले आहे.

- वैध मापन शास्त्र कायदा, २००९.
- वैध मापन शास्त्र (आवेष्टीत वस्तू) नियम, २०११.
- महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११.

वरील सर्व कायदे / नियमांची माहिती ग्राहकांना होणे आवश्यक असल्यामुळे वरील कायदे/ नियमातील काही महत्वाच्या तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

१) कोणत्याही व्यवहारात SI मापन पध्दती (SI system) शिवाय अन्य कोणते ही परिमाण वापरात येत नाही. उदा. लांबी मोजण्यासाठी मीटर, वजन मोजण्यासाठी किलो ग्रॅम व वेळ मोजण्यासाठी सेकंद इत्यादी परिमाण वापरणे बंधनकारक आहे.

२) कोणत्याही व्यवहारात अप्रमाणित वजन वा मापाचे परिमाण वापरून, करार करणे, जाहिरात करणे, पावती देणे कायद्याने गुन्हा असून, तसे केल्यास रू.१०,०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

३) कायद्याने निश्चित केलेल्या प्रमाणित वजन, माप वा तोलन-मापन उपकरण शिवाय अन्य कोणतेही वजन, माप वा तोलन-मापन उपकरण वापरणे गुन्हा आहे. तसे केल्यास कायद्याने रू.१०,०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

४) प्रतयेक व्यवहारात व संरक्षणासाठी वापरत असलेले प्रत्येक वजन, माप व तोलन-मापन उपकरण हे पडताळणी व मुद्रांकन न करता त्याचा वापर करणे गुन्हा आहे. तसे केल्यास रू.१०,०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

५) प्रत्येक व्यवहारात व संरक्षणासाठी वापरात असलेले प्रत्येक वजन, माप व तोलन-मापन उपकरण हे विहित मुदतीमध्ये फेरपडताळणी व मुद्रांकण न करता त्याचा वापर करणे गुन्हा आहे. तसे केल्यास रू. १०,०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

६) प्रत्येक व्यवहारात वापरात असलेले वजन, माप व तोलन- मापन उपकरण हे पडताळणी व मुद्रांकन केल्यानंतर त्यावर संबंधीत निरीक्षक चालू वर्षाचा शिक्का उमटवतात किंवा सील लावतात व त्याबाबत पडताळणी प्रमाणपत्रही देतात.

७) वापरात असलेल्या सर्व वजन, माप व तोलन-मापन उपकरणाचे पडताळणी प्रमाणपत्र व्यापा-याने प्रदर्शित करणे बंधनकारत आहे. तसे न केल्यास रू.२०००/- दंड होऊ शकतो.

८) ग्राहकास वजन, माप व तोलन- मापन उपकरणाबाबत काही शंका असल्यास त्याने त्या वरील निरीक्षकाने लावलेला चालू वर्षाचा शिक्का किंवा सील पाहून किंवा पडताळणी प्रमाणपत्र पाहून खात्री करावी.

९) निरीक्षकाने लावलेले सील किंवा शिक्का व्यापा-याने मिटवल्यास किंवा त्यास काही छेड-छाड केल्यास सदर व्यापा-यास सहा महीने ते पाच वर्षा पर्यंत शिक्षा होऊ शकते.

१०) व्यापा-याने ग्राहकास वजनात किंवा मापात माल कमी दणे, शेतक-याकडून माल विकत घेतांना माल जास्त घेणे कायद्याने गुन्हा आहे. तसे केल्यास रू.१०,०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

११) सोने, चांदी किंवा मौल्यवान वस्तूची विक्री करतांना बूलियन वजनाचाच वापर करणे, हिरे व इतर मौल्यवान खडे विक्री करतांना कॅरेट वजनांचा वापर करणे बंधनकारक आहे. तसेच अशा व्यवहारात वर्ग १ किंवा २ च्या तोलन उपकरणाचा वापर करणे बंधनकारक आहे.

१२) वस्तू घन, अर्धघन, चिकट किंवा घन व द्रवरूप वस्तूचे मिश्रण असल्यास वजनाच्या परिमाणाचा वापर करणे बंधनकारक आहे.

१३) वस्तू रेषीय मापाने विकत असल्यास लांबीच्या परिमाणाचा वापर करणे बंधनकारक आहे.

१४) वस्तू क्षेत्रफळाच्या मापाने विकत असल्यास क्षेत्रफळाच्या परिमाणाचा वापर करणे बंधनकारक आहे.

१५) वस्तू द्रवरूप किंवा घनफळ मध्ये विकत असल्यास आकारमान परिमाणाचा वापर करणे बंधनकारक आहे.

१६) वस्तू नगावर विकली जात असल्यास अंकाचा वापर करणे बंधनकारक आहे.

१७) व्यापारी दांडी तराजूचा वापर करीत असल्यास त्याने तराजू स्टँडला अडकावून टांगून ठेवणे बंधनकारक आहे.

१८) वजन किंवा मापासाठी वापरण्यात येणारे यंत्र ग्राहकास दिसेल असे ठेवले पाहीजे जेणे करून मोजण्याची प्रक्रीया दिसेल.

१९) तोलन उपकरणच्या अचूकतेची खात्री करण्यासाठी व्यापा-याने तोलन उपकरणाच्या क्षमतेच्या एक दशांश किंवा एक हजार किलो पैकी जे कमी असेल त्या क्षमतेची यथोचितरीत्या पडताळणी व मुद्रांकन झालेली वजने ठेवणे बंधनकारक आहे. ग्राहकास तोलन उपकरणाची काही शंका असल्यास तो वजन ठेवून खात्री करू शकतो. लागू असलेल्या वजने न ठेवल्यास रू.२०००/- पर्यंत दंड होऊ शकतो.

२०) प्रत्येक पेट्रोल/ डिझेल पंपधारकाने त्याठिकाणी एक, पाच किंवा दहा लिटरचे माप ठेवणे बंधनकारक आहे. ग्राहकास पंपाबाबत काही शंका असल्यास तो सदर मापाने तपासणी करून खात्री करू शकतो. माप न ठेवल्यास रू.२०००/- दंड होऊ शकतो.

२१) इलेक्ट्रॉनिक तोलन उपकरणावर कोणताही व्यवहार किंवा पेट्रोल/ डिझेल खरेदी करताना प्रथम त्याचा दर्शक '०' दर्शवित असल्याची खात्री करावी. मेकॅनिकल तोलन उपकरणाच्या बाबतीमध्ये त्याचा दर्शक समांतर असल्याबाबतची खात्री करावी.

२२) कोणत्याही मापाने द्रव पदार्थ विकत घेत असताना त्या मापाचा आकारामध्ये काही बदल केला आहे का याची तपासणी करावी.

२३) मिठाई किंवा तत्सम वस्तू ग्राहकासमोर आवेष्टीत करून देत असताना आवेष्टनासह वजन करण्यात येत नाही याची खात्री करावी.

२४) फळे, भाज्या विक्रेत्याने फलक यंत्र (काउंटर मशीन) च्या एका भागावर वजन ठेवलेले असते. अशा ठिकाणी खरेदी करताना सदर वजन काढून दोन्ही पॅन समतोल आहेत तसेच त्याचा दर्शक मध्यभागी किंवा एकाच रेषेमध्ये आहेत याची खात्री करावी.

२५) ऊस, कापूस, सोयाबीन इत्यादी व्यापा-याला विक्री करताना तोलन उपकरणावर दर्शविलेले वजन पावतीवर नमुद केले जात असल्याची किंवा संगणकावर नोंदविले जात असल्याची खात्री करावी.

२६) मच्छीमारांकडून मासे विकत घेताना व साखर कारखान्यांमध्ये वर्ग -३ अचूकतेचा इलेक्ट्रॉनिक तोलन उपकरण वापर करणे बंधनकारक आहे.

## आवेष्टीत वस्तू खरेदी करताना घ्यावयाची काळजी

दैनंदिन व्यवहारामध्ये ग्राहकांना निरनिराळ्या वस्तू विकत घ्याव्या लागतात, सुट्या वस्तू विकत घेत असताना त्याबाबतचा अविश्वास तसेच दुकाने, डिपार्टमेन्टल स्टोअर्स, मॉल, इत्यादी ठिकाणी आकर्षकपणे ठेवलेल्या आवेष्टीत वस्तूच्या गुणवत्ता, वजन, किंमत, इत्यादी बाबत असलेला विश्वास यामूळे ग्राहकांचा आवेष्टीत वस्तू खरेदी करण्याकडे विशेषकल दिसून येतो. आवेष्टीत वस्तू खरेदी करत असताना ग्राहकांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

१. एकाच प्रकारच्या व निरनिराळ्या कंपन्यांनी तयार केलेल्या आवेष्टीत वस्तू खरेदी करताना त्यांचे वजनाचे व किंमतीबाबतची तुलना ग्राहकाला करता यावी यासाठी दैनंदिन व्यवहारामध्ये लागणा-या बिस्कीट, कॉफी, चहा, खाद्यतेल, पावडर डिटरजन्ट पावडर, साबण, शितपेय इत्यादी ठराविक वजनामध्ये किंवा मापामध्ये आवेष्टीत करण्याबाबत उत्पादकाला/ आवेष्टकाला बंधनकारक करण्यात आलेले आहे.

२. प्रत्येक आवेष्टीत वस्तू खरेदी करण्यापूर्वी त्यावर खालील बाबी नमुद केलेल्या आहेत याबाबत खात्री करावी.

   १) उत्पादक, आवेष्टक अथवा आयातदाराचे नाव व पत्ता.
   २) आवेष्टीत केलेल्या वस्तूचे नाव.
   ३) आवेष्टीत केलेल्या वस्तूचे निव्वळ वजन/ माप/ संज्या.
   ४) वस्तू उत्पादनाचा आवेष्टनाचा आयात केलेल्या महिना व वर्ष तसेच खाद्य पदार्थाच्या बाबतीमध्ये तारीख, महिना वर्ष.
   ५) आवेष्टीत वस्तूची सर्व करासहित अधिकतम किंमत.
   ६) ग्राहकांच्या तक्रारीसाठी दुरध्वनी क्रमांक, पत्ता, ई-मेल, इत्यादी.
   ७) जेनिटकली मॉडीफाईड फुड बाबत असे GM नमुद करणे.
   ८) आवेष्टनामध्ये वेगवेगळ्या वस्तूंचे आकार वेगळे असतील तर प्रत्येक वस्तूचे आकारमान.
   ९) आवेष्टीत वस्तूवर नमुद केलेले किंमतीपेक्षा कमी किंमतीचे स्टिकर सोडून इतर स्टिकर लावता येत नाही.
   १०) आवेष्टीत वस्तू वेगवेगळ्या भागापासून तयार होत असेल तर त्या सर्व भागाबाबतची माहिती मुख्य आवेष्टनावर असणे आवश्यक आहे.

३. प्रत्येक आवेष्टीत वस्तूवर नमुद केलेल्या उद्‌घोषनाच्या अक्षराची व अंकाची उंची कमीत कमी १ मिमी असावी.

४. आवेष्टीत वस्तूवरील प्रत्येक उद्‌घोषणा ही सहज वाचण्यासारखी आणि पुसून टाकना न येण्यासारखी असावी आणि किंमत निव्वळ वजनाच्या उद्‌घोषणा ह्या आवेष्टनाच्या रंगाच्या विरूध्द रंगाच्या असाव्यात. तसेच द्रव पदार्थामधून वाचाव्या लागतील अशा प्रकारे लिहलेल्या नसाव्यात. आवेष्टीत वस्तूवर अजून एक वेगळे आवेष्टन दिले असेल तर त्यावर सर्व उद्‌घोषणा लिहिलेल्या असाव्यात.

५. काही ठराविक वस्तू वगळून इतर वस्तूच्या बाबतीमध्ये आवेष्टीत वस्तूचे परिमाण खालील प्रमाणे नमुद करणे बंधनकारक आहे.

अ) जर वस्तू घन, अर्धघन व चिकट किंवा घन व द्रवाचे मिश्रण असेल तर वजनाच्या एककामध्ये परिमाण लिहिलेल्या असावेत.

ब) जर वस्तूची विक्री लांबी मोजण्याचे साधनाने होत असेल तर लांबीच्या एककामध्ये परिमाण लिहिलेल्या असावेत.

क) जर वस्तूची विक्री क्षेत्रफळाच्या मोजण्याच्या साधनाने होत असेल तर क्षेत्रफळाच्या एककामध्ये पमिाण लिहिलेल्या असावेत.

ड) जर वस्तू द्रव स्वरूपामध्ये असेल किंवा घनफळाने विक्री होत असेल तर घनफळाच्या एककामध्ये परिमाण लिहिलेल्या असावेत.

इ) जर वस्तूची विक्री संज्येच्या एककामध्ये होत असेल तर संज्येचा एककामध्ये परिमाण लिहिलेल्या असावेत.

६. आवेष्टीत वस्तूच्या परिमाणाची उद्‌घोषणा वस्तूमानाच्या स्वरूपात असेल तर त्यासोबत त्यामध्ये असणा–या वस्तूंची संज्या नमुद करावयाची किंवा नाही याची उत्पादकाला मुभा असते.

७. आवेष्टीत वस्तूचे परिमाण वजन माप किंवा संज्येचा स्वरूपात नमुद करून सुध्दा ग्राहकाला त्या वस्तूच्या आकारमानाबाबत पुर्ण माहिती मिळत नसेल तर वस्तूचे परिमाण किंवा आकारमान किंवा दोन्ही बाबी लिहलेल्या असाव्यात.

८. आवेष्टीत वस्तुच्या परिमाणाची उद्‌घोषणा नमुद करताना अतिशयोक्ती दिशाभूल करणारे शब्दा उदा. कमीकमी, सरासरी, साधारणपणे, वापरलेले नसावेत.

९. पाच घन से.मी. किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या आवेष्टणावर त्याला जोडलेल्या पट्टी, फित, इत्यादी वर उद्घोषणा नमुद करण्याची परवानगी आहे.

१०. आवेष्टीत वस्तूचे वजन, माप किंवा संज्या नियमा प्रमाणे नमुद केलेली असावेत.

११. उत्पादकाने आवेस्टक, आयातदार वस्तूवर केलेली किंमत कोणत्याही घाऊक विक्रेता/ किरकोळ विक्रेता/ व्यक्तीला खोडता, बदल करता येत नाही.

१२. उत्पादक/ आवेष्टक, आयातदार यांनी एकदा आवेष्टीत करून किंमत छापलेल्या आवेष्टीत वस्तूवरील किंमत नंतर बदलता येत नाही.

१३. ज्या किरकोळ विक्री करणा-या आस्थापना VAT किंवा TOT लागू होत असेल अशा ठिकाणी आवेष्टीत वस्तूच्या निव्वळ वजनाची तपासणी करण्यासाठी एक ग्रॅम अचूकतेचे, कमीतकमी वर्ग-३ चे व प्रिन्टींगची सुविधा असलेले इलेक्ट्रॉनिक तोलन उपकरण ठेवलेले असावेत.

१४. घाउक आवेष्टीत वस्तूवर खालील उद्घोषणा नमुद करणे बंधनकारक आहे.

अ) उत्पादकाचा/ आवेष्टकाचा, आयातदाराचा नाव व पत्ता.

ब) आवेष्टीत केलेल्या वस्तूचे नाव.

क) किरकोळ विक्रीच्या आवेष्टीत वस्तूची संज्या किंवा निव्वळ वजन.

१५. सर्व एलपीजी मार्केटींग कंपन्या/ उत्पादक/ आवेष्टक/ आयातदार/ वितरक यांनी LPG सिलेंडरच्या वजनाच्या तपासणीसाठी 50 kg क्षमतेचा 10g अॅक्युरेसीचा व वर्ग ३ चा इलेक्ट्रॉनिक किंवा मेकॅनिकल तोलन उपकरण ठेवणे बंधनकारक आहे, तसेच ही सुविधा LPG सिलेंडर ग्राहकाकडे पोहचवण्याचे काम करणारे व्यक्तीकडे सुध्दा असणे बंधनकारक आहे.

१६. काही ठराविक आवेष्टीत वस्तूंना या नियमा अंतर्गत सुट देण्यात आलेली आहे. त्या खालीलप्रमाणे,

अ) आवेष्टीत वस्तूचे वजनाने किंवा मापाने विकली जात असेल व तीचे वजन १० ग्रॅम किंवा १०मिली लिटर किंवा कमी असेल अशी आवेष्टीत वस्तू.

ब) रेस्टॉरंट हॉटेल इत्यादी ठिकाणी आवेष्टीत केलेले अन्न पदार्थ.

क) ड्रग प्राईज कंट्रोल अॅक्ट, १९९५ मधील शेड्युल फार्मुलेशन व नॉन फार्मुलेशन नुसार तयार करण्यात येणारी औषधे.

ड) 50 kg वरील कृषी उत्पादने.

जर आवेष्टीत वस्तूचे परिमाण

अ) एक किलो ग्रॅम पेक्षा कमी असेल तर वजनाचे एकक ग्रॅम असावे.

ब) एक मीटर पेक्षा कमी असेल तर लांबीचे एककामध्ये से.मी. असावे.

क) एक वर्ग मीटर पेक्षा कमी असेल तर क्षेत्रफळाचे एककामध्ये घन से.मी. असावे.

ड) एक घन मीटर पेक्षा असेल तर घनफळाचे एककामध्ये घन से.मी. असावे.

इ) एक घन मीटर पेक्षा कमी असेल तर घनफळाचे एककामध्ये घन से.मी.असावे.

ई) एक लिटर पेक्षा कमी असेल तर आकारमानाणामध्ये/ घनफळाचे एकक मिली असावे.

१७. आवेष्टीत वस्तूवर डझन, स्केअर, ग्रॉस, ग्रेटग्रॉस या सारख्या एककामध्ये संख्या लिहलेली नसावीत.

१८. अ) SI मापन पध्दतीपेक्षा कोणतेही ईतर एकक आवेष्टीत वस्तूचे परिमाण लिहताना वापरलेले नसावेत.

ब) संख्येने विकल्या जाणा-या आवेष्टीत वस्तूचे एकक N किंवा U असे असावेत.

१९. जर बेडसिट, धोती, साडी, नॅपकिन, टॉवेल, इत्यादी वस्तू आवेष्टीत करून विकल्या जात असतील तर आवेष्टणावर त्याचे पूर्ण आकारमान लिहलेले असावेत. तसेच एकापेक्षा जास्त वस्तू एकाच आवेष्टनामध्ये असतील तर प्रत्येक आवेष्टीत वस्तूचे आकारमान आवेष्टनावर लिहलेले असावेत.

२०. ॲल्युमिनिअमचा पातळ पत्रा, टिशुपेपर, व्हॅक्सपेपर, टॉयलेटपेपर, इत्यादी आवेष्टीत वस्तूवर वापरता येणा-या पेपर/ शिटची संख्या दर्शविलेली असावीत.

२१. बॅग, पेटी (बॉक्स), कप, पॅन इत्यादी बाबतच्या उद्घोषणा खालीलप्रमाणे असाव्यात.

अ) बॅग सारख्या वस्तूसाठी-- आवेष्टीत वस्तूमधील बॅगाची संख्या व आकारमान नमूद केलेले असावे.

ब) चौरस, आयात किंवा अशा प्रकारच्या पेट्या इत्यादी वस्तूवर -- संख्या, लांबी, रूंदी व गरज भासल्यास त्याची खोली नमुद केलेले असावी.

क) गोलाकार डबे-- आवेष्टनामधील डब्यांची संख्या, व्यास लागू होत असेल तर डब्याची खोली नमुद केलेली असावी.

ड) डब्ब्याचा उपयोग वस्तू ठेवण्यासाठी अभिप्रेत असेल तर त्याची योग्य परिमाणात क्षमता.

२२. कोणत्याही उत्पादकाला, आवेष्टक, आयातदार होलसेल विक्रेता, किरकोळ विक्रेता यांना आवेष्टीत वस्तूवर नमुद केलेल्या किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करता येत नाही.

**सहाय्यक नियंत्रक,**

**वैध मापन शास्त्र यवतमाळ जिल्हा**